११५६

# मराठी महाभारतांचें स्वातंत्र्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११५८

लेखक :
डॉ. ना. गो. नांदापूरकर
एम्. ए., पीएच्. डी.
हैदराबाद, दक्षिण

किंमत एक रुपया

REFBK-0008878

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

७५१५३
१७।३।७१
११९८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५५१५८ दि. २७।३।७१
क्रमांक ११९८

श्री मो. भा. भाटवडेकर प्रकाशन : २

# मराठी महाभारतांचें स्वातंत्र्य

१८७८

लेखक
डॉ. नी. गो. नांदापूरकर
एम्. ए., पीएच्. डी.
हैदराबाद, दक्षिण

किंमत एक रुपया

REFBK-0008878

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २

मराठवाड्यांतील विद्वान साहित्यिक व संशोधक डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या १९५५ सालच्या वार्षिकोत्सवाच्या वेळीं महनीय प्रवक्ते या नात्यानें जें भाषण केलें तें या मालेंतून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

व्याख्यात्यांनीं आपल्या व्याख्यानांतून मराठी महाभारतांविषयीं जो नवा दृष्टिकोण मांडला तो बहुतांशीं सर्वांनाच मान्य होण्यासारखा आहे. विषयाचें महत्त्व लक्षांत घेऊन हें भाषण पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याविषयीं आम्हीं डॉ. नांदापूरकर यांचेकडे परवानगी मागितली व त्यांनीं ती तत्परतेनें दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. आमचा हा उपक्रम जनतेस पसंत पडला तर संस्थेच्या वार्षिकोत्सवाचीं अन्य अध्यक्षीय भाषणेंहि क्रमाक्रमानें प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे.

आवृत्ति १ : १९५६

प्रकाशक :
वासुदेव विष्णु भट
कार्यवाह, मुं. म. ग्रंथसंग्रहालय
ठाकुरद्वार, मुंबई २.

मुद्रक :
लक्ष्मीबाई नारायण चौधरी
निर्णयसागर प्रेस,
२६–२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई २

# मराठी महाभारतांचें स्वातंत्र्य

"मराठी महाभारतांचें स्वातंत्र्य" हा विषय जुना आहे पण जिव्हाळ्याचा आहे. विश्वविद्यालयांतून तर त्याचा अभ्यास होत आहेच पण डॉक्टरेट सारख्या मोठ्या पदवीसाठीं हि ह्याचा अभ्यास होत आहे. त्याअर्थी तो पुरातन म्हणून अप्रिय होण्याचें भय नाहीं. आतां मनु पालटला आहे. आपण स्वतंत्र झालों आहों तेव्हां आपली संस्कृति आणि आपलें वाङ्मय ज्यांवर आधारलें आहे असे आपले पुराणग्रंथ किती अभ्यसनीय आहेत हें आतां पाहिलें पाहिजे. आंग्लाईच्या पहिल्या काळांत "मराठींत वाङ्मय नाहीं आणि आहे तें अगदीं अद्भुत आहे यास्तव विद्यालयीन उच्च परीक्षांच्या अभ्यासास तें योग्य नाहीं" अशी उपेक्षा-दृष्टि होती हें आपणांसारख्या सूज्ञांस सांगणें नकोच. ह्या बीजालाच पुढें अंकुर फुटून त्याचा वृक्ष झाला. मराठी कविता जेव्हां ग्रंथरूपानें प्रकाशांत येऊं लागली तेव्हां तिचा अभ्यास होऊं लागला; पण वरील विचार गृहित धरूनच. यास्तव पुढील विद्वानांतहि तिजविषयीं किंतु वाढत गेला नि आमची एकंदर मराठी कविता परभृत आहे, मराठी भारतें भाषांतरित आहेत असा विद्वानांचा पूर्ण ग्रह बनला. हा प्रकार अजूनपर्यंतहि चालू आहे. यास्तव ह्यांत ग्राह्यांश किती आहे? ह्या विषयाकडे कोत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे? ह्याचा अभ्यास कसा व्हावयास पाहिजे? ह्या हेतूनें मी ह्या विषयाची निवड केली आहे.

भारतावर आणि भारतीय प्रसंगांवर आजपर्यंत मराठींत विपुल रचना झाली. इ. स. १३७८ मध्यें नामापाठकानें 'जैमिनी अश्वमेध' ह्या नांवाचा ग्रंथ रचिला. भारतांतील कथानकावर रचना करणारा हा पहिला ग्रंथकार होय. नंतर इ. स. १५९५ मध्यें विष्णुदास नामानें

आपलें महाभारत लिहिलें, मुक्तेश्वरांनीं पांच पर्वें रचिलीं. नेवाश्याच्या गोपाळ कवीनें समग्र भारत रचिलें अशी वदंता आहे, पण ती सत्य नाहीं. इ. स. १६९० मध्यें कोल्हापुरच्या मुरारी कवीनें भीष्मपर्व रचिलें. शुभानंदानें उद्योग आणि भीष्म हीं दोन पर्वें लिहिलीं. माधव ह्या रामदासी कवीनें संपूर्ण भारत इ. स. १७०३ मध्यें आरंभून १७०७ मध्यें पूर्ण केलें. ह्याच्या इतका प्रचंड टीका-ग्रंथ महाभारतावर दुसरा झाला नाहीं असें कै. पांगारकर म्हणतात. श्रीधराचा पांडवप्रताप तर आबालवृद्धांस परिचित आहेच. सुप्रसिद्ध वामनपंडितांनीं विराटपर्व ग्रथिलें आहे. चंद्रात्मज रुद्र यानें उद्योग पर्व रचिलें आहे. कृष्णदास मुद्गल आणि भालनाथ यांनींहि भारतावर रचना केली असें कै. पांगारकर सांगतात. मोरेश्वर कवीनें उद्योगपर्व रचिलें तर नरहरि मोरेश्वरानें उद्योग, भीष्म, द्रोण आणि कर्ण हीं चार पर्वें रचिलीं. हा नरहरि बीड परगण्यांतील 'ईट' गांवचा रहाणारा होता. याच्याहि पूर्वीं एक मोठा ग्रंथकार होऊन गेला. त्याचें नांव 'हरिदास कान्हा.' त्यानें संपूर्ण भारत रचिलें, पण तो पुढें मानभाव झाला असें सारस्वतकार सांगतात. ह्यानंतरचा ग्रंथकार रामचंद्र बोवा रामदासी. यानें दीड लक्षांचें संपूर्ण महाभारत रचिलें असें कै. पांगारकर म्हणतात. हा ग्रंथ भक्तिपूर्ण आणि रसाळ आहे. पैठणच्या जिवा शिवा कवीनें बारा पर्वें रचिलीं. सुप्रसिद्ध कवि मोरोपंत यांनीं संपूर्ण महाभारत रचिलें. यांच्या ग्रंथाचें नांव आर्याभारत आहे. पुढें मैराळ कवीनें विराटपर्व रचिलें असून अनंत-तनयानेंहि उद्योगपर्व रचिलें. अशाप्रकारें प्रचंड ग्रंथनिष्पत्ति करणारे हे वीस महाकवि आहेत. यांच्या उप्परहि पुढील लेखकांनीं महाभारतावर ग्रंथरचना केली आहे. जनार्दन, नरहरि, पद्मनाभ, शंभुदास भानु, गोविंद दीक्षित, माधवसुत, रामानंद,

जगन्नाथ, विश्वनाथ आणि शिवकल्याण. नवरसनारायणानेंहि दोन पर्वें रचिलीं, महिपतीनें विराटपर्व रचिलें आणि शिवनाथानें भीष्म-द्रोण ह्या दोन पर्वांची रचना केली. एकूण महाभारतावर रचना करणारे हे तेहतीस कवी आहेत.

आतांपर्यंत सांगितलेले कवी पेशवाईच्या काळापर्यंत होऊन गेले. ह्यांची सर्व रचना वृत्तबद्ध आहे. अलीकडील काळांतहि महाभारतावर रचना होऊं लागली. 'चिपळूणकर आणि मंडळीचें' महाभारत 'दामोदर सांवळाराम आणि मंडळीचें' महाभारत, 'भारतगौरव ग्रंथ-मालेचें' भारत, 'बळवंत त्र्यंबक द्रवीड' यांचे ग्रंथ, 'भारतामृत' आणि 'कौरव पांडवांचा इतिहास' ही आणि अवांतर बरीच रचना होऊं लागली. ही सर्व गद्यरूप रचना आहे. अशी एकंदर भारतावर आधारलेली पुष्कळच रचना आहे.

ही सर्व रचना भारतीय कथानकासंबंधींची आहे. पण महाभारतांत असाहि एक भाग आहे कीं ज्यांत कथानक अगदींच नाहीं. केवळ एका महाप्रसंगाची नांदी आहे. त्यावेळीं श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीता सांगितली. ह्या भगवद्गीतेवरील रचनाहि अर्थातच भारतीय आहे. हिजवर तर अनेक लहानमोठ्या कवींनीं रचना केली आहे. कोणी भावार्थदीपिका लिहिली तर कोणी यथार्थदीपिका लिहिली आणि कोणी तर गीतार्णवच निर्मिला. इतर अनेकांनीं, किंबहुना प्रत्येक मोठ्या कवीनें भगवद्गीतेवर रचना केली आहे असें म्हटलें तरी तें फारसें चूक होणार नाहीं. अस्तु.

**विषयाची मर्यादा:** भारतावर अशा प्रकारें किती प्रचंड रचना झाली आणि आज घटकेलाहि होत आहे हें सूज्ञ रसिक

जाणतातच. तेव्हां या विषयाचा व्याप केवढा मोठा आहे हें आपणांस कळून येईल. एवढ्या सर्व ग्रंथांसंबंधीचें विवेचन थोड्या आवकाशांत होणें अगदीं अशक्य असल्यामुळें यांतील प्रातिनिधिक अशा प्रकारचे दोन ग्रंथ घेऊन मी त्यांच्या अनुरोधानें चर्चा करणार आहें. मुक्तेश्वर महाकवी होते यांत तर दुमत नाहींच. मोरोपंत हेहि महाकवी होते ( कित्येक टीकाकार त्यांना साधे कवीहि मानीत नाहींत ). दोघांनींहि मराठींत महाभारतें आणलीं आहेत. तेव्हां "प्राधान्येन व्यपदेशः" या न्यायानें मराठींतील ह्या दोन महाकवींच्या काव्यासंबंधींचा जो निर्णय येईल तोच अधिक उण्या प्रमाणांत इतर कवींच्या काव्यासहि लागू पडणारा आहे.

**शेंडा खुडलेली विषवल्लीः** जगामध्यें आजपर्यंत जे श्रेष्ठ श्रेष्ठ कवी झाले त्यांच्या ग्रंथांकडे सहज दृष्टिक्षेप केला तर ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत येते कीं त्यांच्या काव्याचे विषय कोणत्यातरी प्राचीन अशा महाकाव्यांवर किंवा दंतकथांवर आणि पूर्वागत वाङ्मयावर आधारलेले आहेत. बीजरूपानें त्यांनीं त्या त्या ठिकाणांहून विषय घेतले असले तरी त्यांची घडण आणि रसोत्कट, भावपूर्ण रचना त्यांची स्वतःची आहे. कालिदासाचें शाकुंतल घ्या अथवा भवभूतीचें उत्तररामचरित घ्या, ह्या महाकवींनीं आपल्या काव्यासाठीं जी कथा घेतली ती भारत रामायणांतून; पण ह्या बीजाचा जो प्रचंड वृक्ष निर्माण झाला तो या कवींच्या प्रतिभेनें निर्मिला. विषयाची मांडणी, कथानकांतील घटना, प्रसंग, वर्णनांतील विविधता, कल्पनेची भरारी आणि मानवी स्वभावाचें बहुविध अंगांनीं दर्शन करून देणें ह्यांत त्यांनीं आपलें सामर्थ्य-सर्वस्व आणि कला-कौशल्य ओतलें आहे. त्यांनीं आपल्या प्रतिभेच्या उन्मेषांनीं त्यांत सौंदर्य ओतून त्यांना पृथगात्मता

आणून दिली आणि नवनिर्मितीचें श्रेय संपादन करून जागतिक वाङ्मयांत आपल्या कृतींना अढळ स्थान प्राप्त करून दिलें. त्यांना कोणीहि भाषांतज्ये म्हणत नाहीं. याविरुद्ध सबंध मराठी काव्यालाच भाषांतरित आणि परपुष्ट म्हणण्याची दुष्ट प्रथा आजवर चालत आलेली आहे. आजवर पुष्कळ विद्वानांनीं खंडन केलें तरी ही विषवल्ली समूळ नष्ट झाली नाहीं.

**सर्वांनीच उसनवारी केली आहे:** मानव जातीच्या प्रगतीच्या इतिहासाचें विहंगमावलोकन केलें तरी हेंच दृष्टोत्पत्तीस येतें कीं प्रत्येक पिढी आपल्या पूर्व पिढीचें ज्ञान आणि अनुभव आत्मसात करून त्यांत आपल्या ज्ञानानुभावांची भर घालते आणि जगाला एक पाऊल पुढें नेते. प्रत्येक पिढीनें आणि व्यक्तीनें जर पूर्वगतांच्या अनुभवांचा उपयोग न करून घेतला नि स्वतःच सुधारणेचा मार्ग आक्रमण्याचा विचार केला तर प्रगति निश्चितपणें स्थगित होईल. यास्तव प्रत्येक पिढींत जाणतां व अजाणतां ही कृति चालूच असते. त्याचप्रमाणें काव्यप्रांतांतहि प्रत्येक पिढींत नव्हे प्रत्येक कवींत ही उसनवार चालू असते. कवि जन्मावा लागतो हें म्हणणें जसें सत्य आहे, तसेंच तो संस्कारांनीं बनलेला असतो हेंहि सत्य आहे. कवीवर जे हे संस्कार होतात ते पूर्वकवींचे आणि सभोंवतीच्या समाजाचे असतात. ह्या सर्व संस्कारांना एकत्रित करून त्यांत आपलें व्यक्तिवैशिष्ट्य ओतून जो कवि आपली कृति निर्माण करतो आणि स्वप्रतिभेनें तिला अलौकिकत्व देतो तोच महाकवि. पूर्वकवींची प्रतिभा संस्कृतांतून जनन पावली; पावो. पण त्यांत बिघडलें कोठें? वस्तुतः हा प्रश्नच गौण आहे. प्रतिभेचें जनन कोण्या कुळांत झालें हें पाहून तिचें महत्त्व ठरवावयाचें नसतें. "दैवायत्तं कुले जन्म मदधीनं तु पौरुषम्" ही

कर्णाची उक्ति अर्थांतरानें यां ठिकाणीं समर्पकतेनें लागू पडते. कोणत्याहि वाङ्मयापासून कवींना स्फूर्ति होवो, त्यांनीं आपल्या कृतींत स्वत्व पूर्णपणें ओतून त्यांना अमरत्व प्राप्त करून दिलें असेल तरच त्यांचा पराक्रम. मराठी कवींच्या समोर संस्कृतसारखें अभिजात आणि अत्यंत उच्च तसेंच विविधांगपूर्ण आणि नवरसपूरित वाङ्मय असल्या-कारणानें साहजिकच त्यांची दृष्टि त्या वाङ्मयाकडे वळली. पाश्चात्य वाङ्मयांत देखील ग्रीक आणि लॅटिन विद्याकलांचें पुनरुज्जीवन झाल्यानंतर युरोपमधील साऱ्या लहानमोठ्या कवींनीं आपल्या काव्यासाठीं ह्या दोन भाषांतील ग्रंथांचीच सार्वत्रिक उसनवारी केली आहे. या सर्व वाङ्मयावर भाषांतरितपणाचा आरोप करणें किती उचित होईल? या योगानें मोठमोठ्या कवींना भाषांतऱ्ये नि परपुष्ट म्हणून खालच्या पायरीवर आणून बसवावें लागेल.

**हा मिथ्या आरोप येण्याचें कारणः** मराठी कवितेवर हा जो परभृततेचा आरोप आला आहे तो त्यांतील विषयांच्या पौराणिकतेमुळें आणि आध्यात्मिकतेमुळें मुख्यतः आला असावा. पण वस्तुविषयाची निवड करतांना कवींवर आपला दुराग्रह कां लादावा? कवी हे निरंकुश असतात तसेच द्रष्टेहि असतात. जें सौंदर्यसंपन्न आणि मनोरम असेल तेंच ते कणाकणानें वेंचून घेतात आणि क्षणाक्षणाच्या नवेपणानें लोकांपुढें मांडतात. यांतच कालमानानुसार सामाजिक अभिरुचींत स्थित्यंतर होत असतें. मुक्तमयूरांच्या आणि तत्पूर्वींच्या मराठी कवींच्या काळीं जनमनावर पौराणिक विषयांची मिठी पक्की बसली होती. त्यामुळेंच त्यांनीं ते विषय आपल्या काव्यलेखनास निवडले. आजच्या कविमनावर, या सामाजिक अस्थिरतेच्या काळांत वेगळेंच दडपण पडलें आहे. वास्तव आजच्या काळांत नाटक, कादंबरी आणि

लघुकथा यांतून प्रचलित युगांतील पदोपदीं भासमान होणारे आणि त्रास देणारे असे अनेक प्रसंग येत असतात. एवंच, कविमनावर ज्या घटनांचे आघात होतात, त्यांचेच निनाद त्यांच्या काव्यांतून उमटतात. 'काव्य हें जीवनावरील भाष्य आहे' असें जें मॅथ्यू अर्नोल्ड म्हणतो तें सर्वतोपरी सत्य आहे. जीवनाला सर्वथैव व्यापून टाकणारे विषय निवडण्यांत कवीचें कौशल्य प्रथमतः प्रगट होतें; धर्म आणि अध्यात्म यांनींच भारतीय जीवन अद्यापपोवतों व्यापिलेलें आहे. मानवाचे पारस्पारिक संबंध, जगांत सुखानें राहण्याची इच्छा आणि अंतीं परलोकींहि सौख्य मिळवून घेण्याची आकांक्षा पूर्ण करून देणारें साधन म्हणूनच पौराणिक वाङ्मयाकडे लोकांचा कल असे. जीवनांतील उच्चतम सुखप्राप्ति करून देण्याचा विचार आणि व्यवहार्य असे उपाय सुचवून वर भक्तिमार्गाचाहि आदेश त्यांत असल्यामुळें त्याच वाङ्मयाची पूर्वकवींनीं निवड केली आणि आपल्या कालमानानुसार त्यांची गुंफण केली. आजच्या युगांतील वाङ्मयनिर्मितीकडे पाहिलें तर तेथेंहि हेंच तत्त्व दिसतें. मानवी जीवन सर्वतोपरी सुंदर, सुसह्य, सुखावह आणि सुपरिष्कृत व्हावें एतदर्थच प्रचलित कालांतील गोष्टींची चर्चा त्यांतून होत असते. आजच्या युगांत निर्मितीचे प्रकार, साधनें आणि कांहीं नैतिक वा वैचारिक मूल्यें पालटलीं असतील —आणि तीं कालानुसार पालटणार यांत विशेष नवल नाहीं—तत्रापि वाङ्मयाचा जो जीवनविषयक मुख्य उद्देश तो नाकारतां येणें शक्य नाहीं. मराठींतील प्राचीन वाङ्मयानें हें काम उत्कृष्टपणें पार पाडिलें आहे. तेव्हां पौराणिक आणि आध्यात्मिक विषयांच्या रचनेमुळें तें उपेक्षणीय ठरत नाहीं.

आतां यांच ठिकाणीं स्वतंत्र निर्मितीविषयीं कांहीं सांगणें आवश्यक आहे. स्वतंत्र ग्रंथरचनेसंबंधीं आमच्या कल्पना आज मोठ्या चमत्कारिक होऊन बसल्या आहेत. साहित्यविषयक ग्रंथांतहि त्याची कल्पना मोठी विक्षिप्त मांडली गेली आहे. कथाविषय आमूलाग्र नवा असावा असा साहित्यशास्त्रज्ञांचा आग्रह दिसतो. पुरातन संतकाव्यांत तो तसा नसल्यामुळें त्याजकडे ते संशयानेंच पाहतात. 'नवनिर्मितीचें सामर्थ्य त्यांच्यांत दिसत नाहीं'. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा प्रतिभा' अशी प्रतिभा त्यांच्यांत नाहीं, पूर्वकवींच्या वस्तुविषयाची कल्पना विलासानें सजावट करण्याचें कामच त्यांनीं केलें.' अशा सारख्या अभिप्रायांवरून त्यांना ही प्रतिभा गौणच वाटते. अपूर्व कथावस्तु निर्माण करणें हें उच्च प्रतिभेचें लक्षण सर्वांना मान्य आहे. काल्पनिक कथावस्तु निर्माण करतांना ह्याचा अवश्य अवलंब करावा. पण ऐतिहासिक, पौराणिक काव्याची पुनर्निर्मिति करतांना काय करावें? ह्या अपूर्वतेच्या कल्पनेमुळें ऐतिहासिक गोष्टी अगदीं चुकूनहि सांगूं नयेत, असा याचा अर्थ होईल. एकदां कोणा पुरातन महाकवीनें केलेलें काव्य पुन्हा दुसऱ्यानें कोणीं सांगितलें कीं, तें लागलीच भाषांतरित वा गौण होणार. तेव्हां ह्या अपूर्ववस्तुनिर्मितीच्या कल्पनेचें मर्म कांहीं वेगळेंच असलें पाहिजे असें दिसतें. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, 'वस्तु' शब्दाचा अर्थ कथानक असा घेतला जातो, म्हणून हा आक्षेप येतो. 'वस्तु'चा अर्थ वस्तुतः 'अर्थ' असा आहे. आणि ह्या धोरणानेंच ध्वनिकारांनीं ध्वनीचे तीन भेद केले आहेत. वस्तुध्वनि, अलंकारध्वनि आणि रसध्वनि. यांत वस्तुध्वनि म्हणजे अर्थ ध्वनित असणें. असो. 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' हें जरी सत्य असलें तरी इतरांनीं त्या विषयावर रचना करूं नये असें थोडेंच आहे? आणि हीं

कल्पना तरी कोणी मानली आहे ? ज्यांना नवनिर्मितीचें सामर्थ्य होतें पण पूर्वकथाच विशिष्ट उद्देशासाठीं सांगावयाची होती, त्यांनीं व्यासोच्छिष्टावरच आपली भूक भागविली. इतकेंच नव्हे, तर आमचे मुक्तेश्वर तर ही गोष्ट अभिमानानें सांगतात कीं, जीर्णकवींपासून एकेक अक्षराची भीक मागून मी 'रुख' कविनायक झालों आहें. यावरून पूर्व कवींना अशा प्रकारें व्यासादिकांच्या आधारानें रचना करण्यांत गौणत्व वाटत नव्हतें असें दिसतें. त्याचप्रमाणें 'अपूर्व-वस्तुनिर्मिती'ची त्यांची कल्पनाहि वेगळी होती आणि तीच सर्वतोपरि उचित अशी आहे.

मुक्तेश्वरच नव्हे तर आमचे बहुतेक सर्वच पूर्वकवि श्रीमद् व्यासांचा मागोवा घेत चालले आहेत. आणि त्यांतहि चमत्कार असा कीं, ज्ञानेश्वरांसारख्या एखाद्यानें जरी प्रथम अशी चूक केली असली तरी तदुत्तर सर्वच कवी तशा प्रकारची चूक करीत आले आहेत. अपूर्वत्वाची ही आधुनिक कल्पना ह्यांना रुचलीशी दिसत नाहीं. त्यांना ती कांहीतरी अपूर्वच सुचवीत होती असें वाटतें. प्रत्येकानें महाभारताकडे पाहिलें आणि त्यानेंहि ज्याच्या त्याच्या बुद्धिवैभवा-प्रमाणें ज्याला त्याला कांहीं तरी अपूर्वत्व दाविलें. ह्यापेक्षां अधिक स्पष्ट म्हणजे त्या त्या प्रत्येक कवीनें एका विशिष्ट दृष्टिकोणांतून महाभारताकडे पाहिलें आणि स्वतःचें असें एक नवेंच तंत्र निर्माण करून आपल्या ग्रंथनिर्मितीसाठीं त्याचा उपयोग केला. एवंच भिन्न दृष्टिकोणांतून पाहतांच एकाच वस्तूचें कांहीं वेगळें सौंदर्य प्रतीत होतें. तिच्यांत कांहीं वेगळा अर्थ प्रगट होतो आणि कवि आपल्या तंत्रानुसार त्याचा उपयोग करतो. वास्तवच भगवद्गीतेसारखें एकच ग्रंथ असतांहि भिन्न भिन्न आचार्यांनीं तिचे भिन्न भिन्न अर्थ लावले.

वास्तवच ज्ञानदेव माउलीनें भावार्थ दर्शविला असतां वामन पंडितांनीं यथार्थ प्रगट करण्याचा प्रयत्न केला, आणि दासोपंतांनीं त्यास सव्वा लक्ष ओवी वाहिली. इतकेंच काय, रामायणासारखी एकच कथा असतांना मोरोपंतांनीं तिजवर आपल्या कल्पकतेचा साज चढवून १०८ रामायणें रचिलीं, त्याचप्रमाणें त्याच पंतांनीं एकच कृष्णकथा अनेक परीनें वर्णिली यांतील मर्मही हेंच आहे. ह्या भिन्न दृष्टिकोनामुळें उपन्न होणारी पृथगात्मता नाकारतां येत नाहीं. अस्तु. विषय स्पष्ट होण्यासाठीं अधिक एक दोन उदाहरणें देतों. नुकत्याच झालेल्या जागतिक युद्धांत इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया एका पक्षास आणि जर्मनी, जपान, इटली दुसऱ्या पक्षास असे झुंजत होते, हें आपणांस विदित आहेच. या युद्धाचा इतिहास प्रत्येक राष्ट्रानें लिहिला असेलच. पण त्यांत एकरूपता असेल काय? जयापजयासारख्या घटना जरी परिणामतः एकरूप दिसत असल्या तरी प्रत्येक राष्ट्रानें आपल्या विशिष्ट दृष्टिकोनांतून, स्वतंत्रानुसार तो इतिहास लिहिला असल्याकारणानें त्या सातहि इतिहासांत भिन्नता राहील. एका जागतिक युद्धाचींच हीं सात चित्रणें असलीं तरी तीं सर्व स्वतंत्र आहेत. तद्वतच एका महाभारतावर अधिष्ठित जरी मराठी भारतें दिसलीं तरी तीं विशिष्ट दृष्टिकोणांमुळें मुळाहून आणि परस्परांहून भिन्न आहेत. दुसरें उदाहरण, अफझलखान वधाचें घ्या. मराठ्यांनीं आणि त्यांच्या शत्रूंनीं केलेलीं वर्णनें अगदीं स्वतंत्र होत. शिवाजी महाराजांनीं खानाचा वध केला ही ऐतिहासिक घटना जरी एकच असली तरी प्रत्येकाचा दृष्टिकोन भिन्न असल्यामुळें दोन्ही कथानकांची मांडणी भिन्न राहील. त्यांत विशिष्ट गोष्टींनाच गौण–प्राधान्य दिलें जाईल आणि अर्थात् ह्याचमुळें दोन्हींचे परिणाम

भिन्न होतील. दोन्ही कथनांतील व्यक्ती भिन्न भासतील. एवंच हीं उभय कथानकें परस्परांहून भिन्न आणि स्वतंत्र राहतील. अस्तु.

**मुक्तमयूरांच्या भाषांतऱ्येपणाविषयीं एकंदर समजः** मुक्तेश्वरांसंबंधींचें विवेचन करतांना सारस्वतकार, भिडे, पांगारकर आणि ओक यांपैकीं कोणीहि त्यांच्या काव्यास भाषांतरित म्हणत नाहींत. त्यांची रचना भारताधिष्ठित स्वतंत्र काव्य समजून सर्वांनी तिचें मूल्यमापन केलें. स्वतः मुक्तेश्वर आपल्या काव्यास भारताची टीका, अनुवाद आणि प्रगटार्थ दाखविणारें भारत असें म्हणतात. मुक्तेश्वरांनंतरचे ग्रंथकारहि त्यांच्या काव्यास भारतटीका असेंच म्हणतात. ज्ञानेश्वरी, नाथभागवत इ. ग्रंथांना टीका हें अभिधान असलें तरी स्वतंत्र अस्तित्व होतें नि आहे. त्याचप्रमाणें मुक्तेश्वरांच्या भारताविषयींहि त्यांच्या मनांत स्वतंत्रतेची कल्पना होती असें दिसतें. याविरुद्ध बरेच टीकाकार मोरोपंतांचें काव्य भाषांतरित आहे आणि तो भाषांतऱ्या कवि आहे असें म्हणतात. या टीकाकारांत कृष्णशास्त्री चिपळूणकर, डॉ. विल्सन, रा. ब. रानडे, आणि वि. मो. कुंटे हे प्रमुख होत. त्यांच्या मताचें खंडन निबंधमालेंत 'मोरोपंतांची कविता' या निबंधांत लिहून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केलें आहे. आक्षेप जसे वावदूकपणाचे तसें त्याचें खंडनहि आवेशपूर्ण होतें. दोघांनींहि पंतांची कविता ज्या भारत-भागवत रामायणादि ग्रंथांवर आधारलेली आहे त्या मूळ संस्कृत ग्रंथांशीं कधीं पूर्णपणें ताडून पाहिलीच नाहीं. चिपळूणकरांनीं सुंदोपसुंदाख्यानाचें विवेचन केलें. त्यांत मुक्तेश्वरांच्या पांच ओंव्या भाषांतरित असून पंतांची केवळ एकच आर्या भाषांतरित आहे. पण ही शलाका-परीक्षा आहे. पंतदूषकांनीं 'मुखमस्तीति वक्तव्यं' अशासारखीं कांहीं तरी विध्वंसक विधानें केलीं आणि

शास्त्रीबुवांनींहि संरक्षकाची भूमिका स्वीकारून केवळ तर्क, परमत कुंठित करण्याची हातोटी, जळजळीत देशाभिमान आणि ओजस्वी भाषा यांच्या बळावरच आपला पक्ष प्रस्थापिला. श्री. रा. भि. गुंजीकरांनीं मात्र मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांच्या भारतांतील उतारे देऊन त्यांचें भाषांतरत्व सिद्ध केलें, असें पांगारकर म्हणतात. पण श्री. अ. का. प्रियोळकरांच्या मतें ते तुलनात्मक लेख गुंजीकरांचे नसून श्री. वा. दा. ओकांचे आहेत. यावरून ओकांच्या मतें मुक्तमयूरांची कथा भाषांतरित आहे असें दिसतें. पांगारकरांचें मत थोडें गुळमुळीत आहे. पांगारकरांनंतर, पंतांच्या भागवती काव्यावर अधिकारवाणीनें लिहिणारे लेखक प्रा. बनहट्टी हे मुक्तमयूरांच्या भारतांस भाषांतरच मानतात, पण "तें भाडोत्री भाषांतर नसून वर्ण्यविषयाशीं तादात्म्य होऊन स्वयंस्फूर्तीनें अंतःकरणापासून निघालेलें वाङ्मय होय. यास्तव मुक्तमयूरांना भाषांतऱ्ये म्हणणें योग्य नव्हे" असें शेवटीं सुचवितात. या उलट अगदीं अलीकडचे कांहीं विद्वान पंतांच्या भारतास भाषांतरच मानतात.

**मुक्तमयूरांचीं भारतें भाषांतरें वाटण्याचीं कारणें:** भाषांतर म्हणणाऱ्यांचें मत असें कीं दोघांच्याहि काव्यांत कांहीं ठिकाणीं शब्दशः भाषांतरें आहेत, कांहीं ठिकाणीं भावार्थ आणला आहे, कांहीं ठिकाणीं मूळ कल्पना आहेत, अलंकार आहेत, विचार आहेत. आणि कांहीं ठिकाणीं तर श्लोकामागून श्लोक भाषांतरित आहेत. एवढ्या गोष्टी प्रत्यक्ष दिसत असतां त्यांना भाषांतर कां न म्हणावें ? सकृद्दर्शनीं हें म्हणणें योग्य दिसतें. तेव्हां तें किती सत्य आहे तें पाहिलें पाहिजे. मुक्तमयूरांच्या या भारती रचनेंत त्यांनीं किती भाषांतरें केलीं हें पाहिलें म्हणजे आपोआपच या वादाचा निर्णय

लागेल. आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तिक या पांच पर्वांत मुक्तेश्वरांनीं भारतावर एकंदर १४०६२ ओंव्या इतकी रचना केली आणि पंतांनीं ५७७८ आर्या रचिल्या. या पर्वांत भारताची श्लोक संख्या २६१५० च्या वर आहे. संख्याभेदावरून प्रथम दर्शनींच हें आढळतें कीं हीं भाषांतरें नव्हेत. तथापि दोघांच्याहि उपरिनिर्दिष्ट रचनेंत कांहीं स्थळें भाषांतरित आहेत हें निर्विवाद. त्यांच्या संख्येचें परिगणन केल्यास मुक्तेश्वरांत ती संख्या ३१०० भरते, तर पंतांत ११८० भरते. ह्या ठिकाणीं एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत ठेविली पाहिजे कीं ही गणना अगदीं थोडासुद्धां जिला भाषांतराचा वास येतो अशा ओवी—आर्येचीहि केली आहे; वस्तुतः ती तशी नाहीं. कित्येकांना तर तीं भाषांतरें वाटणार देखील नाहीत; पण अगदीं निष्ठुर होऊन जरी अशी संख्या वेंचिली तरी ती त्यापेक्षां अधिक भरत नाहीं. अस्तु. या भाषांतरांत भारताशीं त्याचें प्रमाण जर पाहिलें तर तें कितीतरी क्षुल्लक आणि उपेक्षणीय वाटतें; आणि या कवीच्या रचनेच्या मानानें पाहिलें तर तेथेंहि तें तसेंच दिसतें. मुक्तेश्वरी भाषांतराचें प्रमाण ९:२ असें असून पंतांचें ५:१ असें आहे. आतां ज्या ग्रंथांत चार पंचमांश भाग स्वतंत्र आहे आणि एकपंचमांश भाग भाषांतरित आहे त्याला भाषांतर म्हणून ठरवितां येईल काय? ह्याचा विचार विद्वानांनींच करावा. बरें, या भाषांतरोपम ओवी—आर्येची रचना पाहिली तर तेथें हें दिसतें कीं ही भरती केवळ कथानका-संबंधींची अधिक असून वैचारिक अथवा कल्पनामूलक फार अल्प आहे. कथानकाची उसनवारी करणें किंवा त्याचा कांहीं भाग शब्दशः तसाच उतरणें एवढ्यावरून आमच्या मराठी कवींना भाषांतरे म्हणणें अगदीं अन्यायाचें आहे, प्रमादी आहे. तीच गोष्ट

विचारासंबंधींहि आहे. एकच संस्कृति, धर्म आणि विषय असल्या-कारणानें विचारसादृश्य आणि विचारैक्य हें अपरिहार्य आहे. याच कारणामुळें त्यांचे कांहीं विचार भारतानुवर्ती आहेत.

**इतकीं देखील भाषांतरें कां आलीं?:** आतां हा जो भाषांतरकल्प अल्प विभाग आला आहे, त्याचें कारण पाहूं गेलें असतां तें उभय कवींच्या भारतलेखनाच्या पद्धतींत आढळतें. आमचे उभय प्राकृत कवि चांगले व्युत्पन्न होते, पंत पुराणिक होते ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे; आणि मुक्तेश्वरी भारताच्या रचनेवरून ते प्रत्यक्ष पुराणिक नसले तरी पुराणिकांसाठींच ह्यांनीं रचना केली असावी, नि आपलें भारत श्रोतृसमुदायांत इतर पौराणिक ग्रंथाप्रमाणें पठण केलें जावें असें त्यांना वाटत असावें असें दिसतें. मुक्तेश्वरांनीं आपल्या भारतांत अनुक्रमणिका पर्वापासून विराटपर्वांतर्गत विवाहोपपर्वाचाहि उल्लेख केला आहे. कथांचा आणि आख्यानांचाहि उल्लेख केला आहे, एवढेंच नव्हे तर बहुतेक सर्व ठिकाणीं तो क्रम तसाच ठेविला आहे. एक कथा संपवून दुसरीचा आरंभ करतांना मुक्तेश्वर बहुधा तिचा स्वतंत्रपण आरंभ करतात आणि शेवटहि व्यवस्थित करतात. पण पुष्कळ ठिकाणें अशीं आहेत कीं तेथें ती कथा अर्धी तशीच सोडून दुसरी कथा अवचितपणें आरंभिली आहे. भारतांतहि हाच क्रम आणि अशीच स्थिति असल्याकारणानें मुक्तेश्वरांचे हे आरंभ नि शेवट असे झाले आहेत. सर्पसत्रांतून वांचण्यासाठीं काय उपाय करावा याची चर्चा चालू असतां तें कथानक तसेंच सोडून परीक्षितीच्या कथनास आरंभ केला आहे. भारतांतहि अशीच रचना असल्यामुळें मुक्तेश्वरांसहि ती तशीच ठेवावी लागली. महाभारतांत पुष्कळशीं आख्यानें आरंभीं संक्षेपानें सांगितलीं असून पुढें जनमेजयाच्या

प्रश्नावरून तीं विस्तृत सांगितलीं आहेत, अशी दुहेरी रचना आहे. मुक्तेश्वरांनींहि आपल्या रचनेंत तीं आधीं संक्षिप्त घेऊन नंतर विस्तृत वर्णिलीं आहेत. ही सर्व रचना भारत ग्रंथ समोर ठेवून केलेली दिसते. कथाचिंतनानें जर रचना केली असती तर अशी दोनदोनदां तीनतीनदां तीच कथा त्याच प्रसंगीं आली नसती. कथारचनेंत भारतक्रम शक्यतोंवर सोडूं नये असेंच धोरण दिसतें. पुढील कथानकाची सूचना देणारी रचना तर सर्वत्रच आहे. आदिपर्वांतील वंशावळी, सर्पसत्रांतील सर्पांचीं नांवें, दिग्विजयांतील देशांचीं नांवें, दुर्योधनमुखी घातलेलें राजसूयांतील राजांच्या करभाराचें वर्णन, दुर्योधनादि शतबंधूंचीं नांवें, कच्चित प्रश्न, यक्षप्रश्न आणि धर्माचीं उत्तरें इत्यादि भाग भारतग्रंथ पुढें ठेवून रचिलेला दिसतो. त्यांत पुष्कळसा क्रम मुळांतील असून विषयहि तोच आहे. मार्कंडेय समस्या नाममात्र उल्लेखून पुन्हा कथासूत्र भारतानुसार हातीं घेतलें, कथानकास तादृश अनावश्यक भागहि मुळानुसार कांहीं ठिकाणीं आला, त्याचप्रमाणें पुष्कळशीं वर्णनें मागील पुढें पण तेथेंच वार्णिलीं आहेत. पुष्कळसे प्रसंग भारताधारें वर्णिले आहेत. कांहीं मुळांतील कल्पना पालटून त्याच ठिकाणीं घातल्या आहेत. हा सारा प्रकार भारत पुढ ठेवून रचना करण्याचा परिणाम आहे. याचें आणिकहि एक प्रमाण म्हणजे महत्वाचीं नसलेलीं बरीच संभाषणें भारतानुसार जशींच्या तशींच दिलीं आहेत. त्यावरून त्यांची भारत लेखनाची पद्धति ग्रंथ पुढें ठेवून लिहिण्याची दिसते. मात्र ह्या विधानाचा असा अर्थ नाहीं कीं त्यांनीं प्रत्येक शब्द वा वाक्य भारतांत पाहूनच लिहिल; तर हाताशीं ग्रंथ ठेवून वेळोवेळीं पाहून कथाभागाची रचना केली. या कारणामुळेंच इतकीं भाषांतरें त्याच्या रचनेंत शिरलीं.

पंतांनींहि मुक्तेश्वरांप्रमाणेंच महाभारत ग्रंथ पुढें ठेवून रचना केली होती असें दिसतें. त्यांनींहि मुक्तेश्वरांप्रमाणेंच आपल्या ध्येयानुसार त्यांत पुष्कळ ठिकाणीं ढवळाढवळ केली. भारतांतील अनुक्रमणिका, दिग्विजय वंशावळी, सर्पांचीं नि कौरवांचीं नांवें, यक्षप्रश्न, नारदप्रश्न इत्यादि विभाग वगळला वा संक्षेपिला असला तरी त्या त्या ठिकाणीं त्यांचा उल्लेख करून ग्रंथ विवरण केलें आहे. भारतीय कथांना अनुलक्षून त्यांचीहि रचना कधीं कधीं कृत्रिम झाली आहे. एक कथा अर्धीच सोडून दुसरी आरंभ करण्याची रचना पुष्कळ ठिकाणीं जी झाली ती अर्थांतच भारतानुसरणानें झाली. पौलोमादि सर्प पर्वांतील कथाभाग भारताप्रमाणें आणि त्याच क्रमानें आणण्याचा त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केला. भारतांत क्वचित दोन वा तीन वेळां आलेल्या परीक्षिति, जरत्कारु, द्रोण इत्यादिकांच्या कथा त्यांनींहि तशाच आणल्या. पण त्यांनीं आपल्या कौशल्यानें कथा चालू ठेवण्यास योग्य असे भागच तेथें तेथें वर्णून पुढील भाग योग्य ठिकाणीं आणले, आणि क्वचित प्रसंगीं पूर्वस्थलीं न वर्णिलेला भागच तेवढा सांगितला. कधीं कधीं पूर्व कथेकडे केवळ अंगुलिनिर्देश करूनच आपलें कथानुसरण पूर्ववत चालू ठेविलें. पंतांनीं मुक्तेश्वरांप्रमाणें लहान सहान प्रसंग निर्देशिले नसले तरी मोठ्या कथानकांत त्यांनीं भारतक्रम आणि भारतभाव सोडिला नाहीं. उलटापालट जरी केली नाहीं तरी भाषांतरित आर्यांत मूळानुसार क्रमच स्वीकारिला, मुळांतील कांहीं भाषणें त्याच क्रमानुसार दिलीं, कांहीं रचना टीकेप्रमाणें केली, कांहीं स्थळीं मुक्तेश्वरांप्रमाणें भारताचा भाव आपल्या शब्दांत आणला आणि कांहीं ठिकाणीं मुळांतील कल्पना मुक्तेश्वरांप्रमाणेंच पालटून आपल्या शब्दांत सांगितली. या सर्व

गोष्टींवरून त्यांनींहि भारतग्रंथ पुढें ठेवूनच आपली रचना केली होती असें दिसतें. पंतांविषयीं आणिकहि विधान करण्याइतकें साहित्य उपलब्ध झालें आहे. त्यांनीं केवळ भारतच समोर ठेविलें असें नाहीं तर मुक्तेश्वरी भारतहि आपल्यासमोर ठेविलें असावें असें दिसतें.

यावरून त्यांच्या भाषांतरित रचनेचा उगम सहज सांपडतो. दोघांनींहि भारतकथा न सोडण्याचा निश्चय केला होता आणि भारतग्रंथ समोर ठेवून रचना केली होती. यास्तवच त्यांच्याकडून समानार्थक कथा आणि तत्तन्मतप्रतिपादक भागहि आला. भारता-सारखें एवढें अतिप्रचंड काव्य भाविकतेनें आणि आपल्या उद्देशानुसार महत्त्वाचा भाग लुप्त होऊं न देतां, आपल्या भाषेंत वर्णन करीत असतां, कांहीं ठिकाणें अशीं समान निघणारच. रामायण, भारत आणि भागवत यांतून मराठी काव्याचा उगम झाला, तेव्हां त्यांतील विचारांचा परिणाम या कवींवर होणें अगदीं अपरिहार्य आहे. कथानक वर्णितांना ज्या ज्या ठिकाणीं भारतांतील सुंदर सजविलेला भाग त्यांना आढळला आणि त्याच्याशीं ते तद्रूप होऊन गेले, तो भाग सहजच त्यांच्याहि लेखणींतून भारतानुसार निघाला. पुष्कळ वेळां व्यासांच्या कल्पना मनश्चक्षूंपुढें सारख्या खेळत राहिल्यामुळें आल्या, पुष्कळ वेळां व्यासांना सांगावयाची गोष्ट मराठी कवींनाहि अभिप्रेत असल्यामुळें आली आणि क्वचित् ठिकाणीं मुळांतील अलंकार वा कल्पना अत्यंत समुचित वाटल्याकारणानें घेतली गेली. एवंच हा सारा भाग अपरिहार्य असें कथानक आणि विषयाशीं तद्रूप होण्यानें आला आहे. सहृदय असा कवि जेव्हां चिंतनाच्या योगानें कोणताहि विषय वा कल्पना आत्मसात् करतो आणि योग्य प्रसंगीं प्रगटितो तेव्हां तें प्रगटीकरण त्याचें स्वतःचें बनतें. त्या कल्पना त्यांच्या

वैशिष्ट्यांसह आविष्कृत होतात. मूळ कल्पनेला जो त्यांनीं आपल्या अंतःकरणाचा उजाळा दिलेला असतो त्यानें जणूं तिचा पुनर्जन्मच होतो. अशा प्रकारच्या भागास कोणीहि भाषांतर म्हणूं शकत नाहीं. मुक्तमयूरांच्या भारतांत असाच प्रकार आहे. त्याच कारणामुळें त्यांच्या काव्यांत समानतेचा भाग आहे, एकरूपत्वाचा आहे आणि भाषांतराचाहि आहे. आणि ह्यावरून त्यांच्या माथीं भाषांतराचा दोष मारला जात आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं दोषारोप करणाऱ्यांपैकीं एकानेंहि हीं ठिकाणें मोजिलीं नाहींत. मग त्यांतून महत्वाचीं किती, गौण किती, अपरिहार्य किती, स्वतंत्र रचना निर्माण करण्याच्या सामर्थ्याभावीं झालेलीं किती, भारतांतील सौंदर्याच्या मोहानें झालेलीं किती, आणि भाषांतराची आवड आणि ध्येय म्हणून झालेलीं किती ? हा विचार फारच दूर !

**बाह्यांग आणि अंतरंग परीक्षेचा निष्कर्षः** विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं निबंधमालेंत भाषांतर ठरविणाऱ्या ज्या गोष्टी सांगितल्या त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे तिन्ही भारतांचा बाह्याकार अर्थात् ग्रंथसंख्या. संस्कृत भारताची ग्रंथसंख्या महाराष्ट्रकवींच्या ग्रंथसंख्येहून कितीतरी पटीनें मोठी आहे. मराठी कवींनीं भारताची उपपर्वे संख्या नि अध्याय संख्याहि पाहिली नाहीं. यास्तव ग्रंथसंख्या, उपपर्वसंख्या, अध्यायसंख्या यांजवरून आमचीं मराठी भारतें भाषांतरित ठरत नाहींत. संस्कृतांतून आजपर्यंत जीं भाषांतरें झालीं त्यांजवरून निर्धास्तपणें असें म्हणतां येतें कीं संस्कृतांतून मराठींत येतांना ग्रंथसंख्येंत भरच पडते. पण प्रस्तुत ग्रंथांत या विभागांत तर फारच अल्प ग्रंथसंख्या आहे. ही झाली बाह्यपरीक्षा. केवळ आकारावरूनची परीक्षा.

**अंतरंगपरीक्षणः** अंतरंगपरीक्षण हें बहिरंगपरीक्षणापेक्षां अधिक महत्त्वाचें. पण ही कल्पना आजवर कोणीच मांडिली नाहीं. अंतरंगाच्या परीक्षणांत पहिली गोष्ट कथानकाची येते. भारतीय कथा सांगण्याचाच दोघांहि महाराष्ट्रकवींचा विचार असल्याकारणानें ढोबळ मानानें कथा तीच येणार हें निश्चित; पण दोघांच्याहि संक्षेपविस्ताराकडे पाहिलें म्हणजे त्यांचा ह्या विषयांत विशिष्ट दृष्टिकोण दिसतो. त्यांनीं यासंबंधीं एक निश्चित धोरण आंखलें होतें असें दिसतें. त्यांनीं भारतीय कथानक साद्यंत घेतलें नाहीं. जेवढा भाग आपल्या विशिष्ट ध्येयास पोषक वा उपोद्बलक वाटला तेवढाच प्रत्येकानें उचलला. त्यांतहि पुष्कळ ठिकाणीं भारतांत ज्या भागाला प्रामुख्य आहे, त्याला त्यांनीं प्रामुख्य न देतां भारतीय साध्या गोष्टींचें प्रमुखपणें विवरण केलें. आपल्या धोरणास प्रतिकूल वा अनावश्यक अशा भागांचा निष्ठुरपणें संक्षेप केला, इतकेंच नव्हे तर मुळांत नसलेलीं वर्णनें आपल्या पदरचीं घातलीं; आणि क्वचित भारतबाह्य कथांचाहि समावेश आपल्या रचनेंत केला. पुष्कळ ठिकाणीं तर असेंहि विधान करतां येतें कीं महाभारतांतील कथानकच त्यांना आकलन करतां आलें नाहीं. महाभारत संस्कृतांतून कांहीं एक सांगतें आणि आमचे मराठी कवी मराठी भाषेंतून आम्हांला दुसरेंच कांहीं सांगतात. उदाहरण म्हणून आपणाला विराटपर्वांतील उत्तरगोहरणाची कथा घेतां येईल.

उत्तरगोग्रहणांत महाभारतकालीन युद्धाचें अत्यंत रोमहर्षक वर्णन आलें आहे. अर्जुनानें आपल्या अल्पशा सैन्यानें विराटपुत्र उत्तराच्या साह्यानें कौरवसेनेचा पराभव केलेला आहे. कौरव-सैन्यांतहि अर्जुनासारखे अग्रज्ञ वीर होतेच, तेव्हां अर्जुनानें आपल्या लहानशा सैन्याच्या हालचालीच अशा कांहीं वेगानें केल्या कीं त्याला

त्यायोगें कौरवांना पराभूत करतां आलें. प्रथम त्यानें कौरवांच्या व्यूहबद्ध सेनेशीं झुंजण्याचें टाळलें नि सेनेपासून दूर परत चाललेल्या दूर्योधनावर आक्रमण केलें नि विराटाच्या गाई मुक्त केल्या. ह्या योगानें कौरवांचा व्यूह विसकटला. कारण कृपाला आपली जागा सोडून त्याजवर चाल कराची लागली. यांत कौरवांचा उजवा बाहु कृप विलग झाला, नि स्थानभ्रष्टहि झाला. तें पाहून अर्जुन त्याच्याशीं झुंज न देतां अभियानोन्मुख अशा कर्णावर घसरला. कर्ण हा तेव्हां सेनामुखीं होता. तेथें त्याचा पराभव करून अर्जुनानें सेनामुख भंगिलें. आतां कृप आणि कर्ण यांच्या सेनेंत अव्यवस्था झाली होती. मागें कृप, मध्यें अर्जुन, समोर द्रोण–अश्वत्थामा, दूर्योधन आदि होते. त्यांतहि कृपांचा विभाग अभंग होता, पण तो धांवपळीनें किंचित् विस्कळित नि थकित होता· यास्तव अर्जुन त्याजवर गेला नि त्याचाहि त्यानें पराभव केला. ह्यांत त्यानें द्रोणाला वळसा घातला, अश्वत्थाम्याला हूल दाखवून स्थानबद्ध करून ठेविलें आणि आपली पिछाडी कृपांचा पराभव करून सुरक्षित केली. ह्याप्रकारें त्यानें शत्रूचीं दोन सैन्यें निकामी केलीं. ह्यानंतर कौरवांची मुख्य सेना द्रोणद्रौणी भोंवतीं असून या दोघांचे विभाग अगदीं व्यवस्थित होते. त्यांच्या मागें आणि अंवतीं भवतीं पराभूत वीर होते. यास्तव अर्जुनानें आतां यांच्याशीं गांठ घेतली नि दोघांहि पितापुत्रांचा, एकामागून एकाचा पराभव केला. अशा प्रकारें त्यानें आतां सेनेचें मुख, उजवा बाहु, मध्यभाग आणि डावा बाहु या सर्वांचा पराभव केला, नि त्यांना आपआपल्या जागेहून हांकून लावलें. दक्षिणाभिमुख असलेलें कौरवसैन्य आतां पश्चिमाभिमुख झालें नि भीष्मापासून दुरावलें. भीष्म मात्र आपल्या जागेवर दक्षिणाभिमुखच होते. पुढें त्यानें भीष्मावर जाण्याचा प्रयत्न केला, पण दोन

८८७६

वेळां भग्न कौरव सेनेनें एकत्र होऊन तो फसविला. इतक्यांत भीष्मानेंच अर्जुनावर चाल केली. आतांपर्यंतच्या युद्धांत अर्जुनानें चाल करावी नि कौरवांनीं आडवावें हाच प्रकार होता. येथें मात्र तंत्र पालटलें. तथापि अर्जुन आपल्या थकलेल्या सैन्यानें भीष्माचाहि पराभव करतो नि सर्वांना मागें सारतो. ह्या गोंधळांत तो त्यांच्या तळापर्यंतहि पोंचतो नि कांहीं कौरववीरांचे गोटहि लुटतो. पण लुटींत अधिक वेळ न घालवितां आपलें सैन्य तेथून बाहेर काढून घेतो. आतां अर्जुनानें सर्वांचा एकेकशः आणि सामुदायिक असाहि पराभव केला असल्यानें आणि स्वतःचेंहि सैन्य थकलेलें पाहून तो अधिक आक्रमण करीत नाहीं, तर कौरवांच्या गोंधळलेल्या मनःस्थितीचा स्वानुकूल उपयोग करून घेण्यासाठीं त्यांच्या आक्रमणाची मार्गप्रतीक्षा करीत राहतो; नि आपलें सैन्य पुन्हां जुळवितो. कौरव वीर पुन्हा आक्रमणाच्या विचारांत असतात. पण भीष्मांनीं सारा रागरंग पाहून युद्ध थांबविण्यास नि परत फिरण्यास सांगितलें म्हणून ते सारे रण सोडून जातात. अशाप्रकारें अर्जुन विजयी होतो, नि परततो.

या युद्धांत अर्जुनानें आपलें रण-कौशल्य नि उत्कृष्ट सेनापतित्व फारच अप्रतिम दाखविलें नि अगदीं लहान अशा परक्या विराटाच्या सेनेच्या साह्यानें कौरवांसारख्या रण-धुरंधरांनाहि धूळ चारिली. हें शिक्षण घेण्यासाठींच तो स्वर्गास गेला होता. त्यानें आपल्या स्वर्ग-वासाचें सार्थक केलें हें जेव्हां धर्मानें पाहिलें तेव्हां एवढा मोठा निग्रही धर्म, आपल्या मनांतील भाव सहसा कोणालाहि कळूं न देणारा पण त्यालाहि आपला आनंद आवरून धरतां आला नाहीं. विराट वारंवार निषेध करीत असतां त्यानें बृहन्नडेची (अर्जुनाची) स्तुति

केली आणि मार खाल्ला त्यांतील मर्म हें आहे. आपण आतां पृथ्वी जिंकली असें जें त्यास वाटलें त्यांत नवल तें काय?

या युद्धांत अर्जुनानें पुढील गोष्टी साधल्या हें दिसतें. तो आपल्या सेनेचा उपयोग आपल्या इच्छेप्रमाणें नि विद्युद्वेगानें करतो, स्वतः फिरून शत्रूलाहि सारखें फिरवितो. तो एकेच ठिकाणीं युद्ध होऊं देत नाहीं, हूल दाखवून शत्रूला पाठीवर घेतो नि पुन्हा उलटून मार देतो. शत्रूच्या चुकीचा अचानक लाभ घेतो. कौरवांनीं आपलें सैन्य जें व्यूहबद्ध केलें होतें तें अर्धेंच होतें, कारण दुसरें अर्धें दूर्योधन आणि गाई यांच्या समागमें परत जात होतें. त्यांतहि तो व्यूहबद्ध सेनेशीं रण देत नाहीं, तर आपल्या हालचालींनीं त्यांना आपल्या अनुकूल अशा परिस्थितींत आणून मग त्यांच्याशीं गांठ घेतो. आपला उद्देश त्यांना कळूं देत नाहीं. सारें रणांगण आपल्या हातीं ठेवतो. तो शत्रूच्या समोरून, मागें जाऊन, त्यांची फळी फोडून आणि आपल्या इच्छेप्रमाणें त्याला युद्ध द्यावयास भाग पडतो. त्याचें धोरण संरक्षक नसून आक्रमक असतें नि शत्रूला सावध होण्यास अवकाश मिळण्यापूर्वींच त्याचा घाव बसतो. या युद्धांत अर्जुनानें घोडदळ आणि पायदळ यांचा उपयोग केलेला दिसतो. रथ मात्र त्यांजपाशीं किती होते हें सांगतां येत नाहीं. एकरथाची कल्पना मात्र लोक समजतात तशी नसून अद्वितीय, अलौकिक रथी एकमेवाद्वितीय वीर अशी आहे. 'एकवीर' हा शब्द भारतांत असाच आला आहे. "ततः प्रववृते युद्धं पृथिव्यामेकवीरयोः" अशा प्रकारें अर्जुनानें आपल्या सेनापतित्वाच्या बळानें गोहरण युद्ध जिंकिलें.

हा भारतीय कथाभाग पाहिला आणि आमच्या मराठी कवींचें हेंच कथानक पाहिलें म्हणजे दोन्हींतील अंतर सहजच कळून येतें.

या सान्या गोष्टींवरून आमचीं मराठी महाभारतें हीं भाषांतरित कृति नसून स्वतंत्र आहेत हें निश्चित दिसतें. ह्या कथानकाप्रमाणेंच त्यांचीं वर्णनेंहि स्वतंत्र आहेत.

पात्रपरिपोषाच्या दृष्टीनें विचार केला तर येथें फारच चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतो. मराठी कवींनीं निर्माण केलेलीं व्यक्तिचित्रणें पुष्कळ ठिकाणीं भारताहून भिन्न आहेत. तीं भारतकालीन अगदींच वाटत नसून त्यांच्या स्वतःच्या काळचीं असल्यासारखीं वाटतात. हा भाग मुक्तेश आणि मोरोपंत दोघांतहि सारखाच आहे. महाभारतांतील धर्म हा अत्यंत राजकारणी, मुत्सद्दी पुरुष वाटतो. तो स्वतःहून राजकारण साधण्यासाठीं आपल्या हालचाली करतो. युवराज असतांनाच त्यास राज्यपद द्यावें हा व्यूह, लाक्षागृहांतून सुटका, द्रौपदीस्वयंवर आणि राजसूय नि वनवास—प्रसंग पहा. सर्व प्रसंगीं त्याच्या हालचाली राजकारणास अनुसरून असून सर्व सूत्रें त्याच्या हातीं असतात. तो दूर्योधनाचे डाव आपल्या कौशल्यानें त्याच्यावरच उलटवितो आणि त्यांतून स्वतः निसटून जातो. त्याच्या प्रत्येक उक्ति—कृतींतून राजकारण भरलेलें दिसून येतें. त्याच्यांत मानवसुलभ इतरहि गुण असले तरी राजकारण हाच त्याच्या स्वभावाचा स्थायीभाव आहे. अशा प्रकारचा राजकारणी आणि मानवी धर्म आमच्या मराठी कवींना रंगवितां आला नाहीं. जी गोष्ट धर्माची तीच गोष्ट इतरहि पात्रांची आहे. महाभारतांतला दूर्योधन आणि आमच्या मराठी कवींचा दूर्योधन या दोघांच्या स्वभावांमध्यें आपल्याला महदंतर दिसून येईल. महाभारतांतील दूर्योधन पांडवांचा वैरी असला तरी त्यांत राजकीय धोरण, पुष्कळसे चांगले गुण आहेत. या विरुद्ध मुक्तेश्वरी दूर्योधन म्हणजे केवळ पापी चांडाळ वाटतो. दूर्योधन हा कसाहि झाला तरी कौरवांचा राजा होता ही गोष्ट

मुक्तेश्वर आणि इतर सर्व मराठी कवी विसरतात. मोरोपंत मात्र महाभारताला अनुसरून दूर्योधनाच्या गुणदोषांसह त्याचें व्यक्तिचित्रण करतात. एवंच पात्रांच्या दृष्टीनें संस्कृत आणि मराठी महाभारतांत महदंतर आहे. संस्कृत महाभारतांतील मानवी आणि ऐतिहासिक पात्रें मराठी महाभारतांत बहुधा अर्धमानवी, अर्धदैवी आणि दैवी अशीं झालीं आहेत. अतएव ह्या भारतीय व्यक्ती राहिल्या नसून जन्मांतर स्वरूपांत ह्या मराठींत अवतरल्या. अर्थांतच त्यांच्यांत पृथगात्मता निर्माण झाली आहे. त्या स्वतंत्रानुसार वागतात.

वैचारिकता पाहूं जातां भारतांतील विचार पुष्कळ ठिकाणीं दोघांनींहि वगळले आहेत. ज्या ठिकाणीं ते प्रदर्शित केले ते संक्षेपानेंच आहेत. पुष्कळ ठिकाणीं आपल्या स्वतःचे आणि स्वकालीन समाजास समर्पकतेनें लागू पडणारे विचार घालून आपल्या समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न मराठी कवींनीं केला आहे. एरव्हीं मराठी स्वातंत्र्य लोपल्यानंतर ही अशी भारतीय रचना कां व्हावी? यांतहि चमत्कार हा कीं विराटपर्वापासून पुढील रचनाच फार आहे. अर्थात् आपल्या कवींचें ध्येय भिन्न म्हणूनच रचनाहि भिन्न आहे.

विचाराप्रमाणेंच भावना, रस, अलंकारादिकांची गोष्ट आहे. महाभारतांत ज्या प्रकारानें आणि ज्या मानानें हीं आलीं आहेत त्या प्रकारानें, त्या मानानें आणि त्याच ठिकाणीं, त्याच प्रमाणांत मराठी भारतांत हीं दिसून येत नाहींत. अलंकारांच्या उपयोगांत हें दिसून येईल कीं संस्कृत महाभारतांत अलंकारांचे प्रकार पंधरा वीसच असलेले दिसतात. या उलट मराठी महाभारतांत ४०–५० प्रकारचे अलंकार दिसतात. अलंकारांच्या उपयोगांतहि महाभारतानें वापरलेले प्रकार त्या

संग्रहालय, ...
अनुक्रम ८०२५९ ... वि: ...
क्रमांक ९९२८ ... नों. दि. १८/३/८१

त्या प्रसंगीं मराठी कवींनीं वापरले नसून पुष्कळच अधिक आणि वेगळे प्रकार वापरले आहेत. अलंकारांच्या उपयोगांत महाभारतकार पुष्कळ वेळां त्यांचा उपयोग केवळ वर्णन विस्तारासाठीं करतात, तर आमचे मराठी कवि ह्या अलंकारांच्या योगानें वर्णनविस्तार करण्यापेक्षां भावनाविलास व्यक्तविण्याचा अधिक प्रयत्न करतात. अर्थात अशा प्रकारचा उपयोग करणें हें केवळ स्वातंत्र्याचें लक्षण आहे. भावनेच्या दृष्टीनेंहि पाहतां एवढें निश्चित सांगतां येतें कीं महाभारतांत जेथें साधें कथानक आहे तेथें आमच्या कवींनीं भावनांचा कल्लोळ प्रगट केला आहे. महाभारतांत जेथें साध्या भावना आहेत तेथें आमचे कवी गुंतागुंतीच्या भावना रेखाटतात. एवं च महाभारतापेक्षां आमच्या मराठी कवींच्या भावनांचा प्रपंच अधिक आहे, आणि ह्याचाच परिणाम म्हणजे कधीं कधीं ज्या ठिकाणीं महाभारतांत साधी गोष्ट सांगितलेली असते तेथें आमचे कवी सरस रमणीय अशी निर्मिति करतात. केवळ एका उदाहरणानें ही गोष्ट स्पष्ट होईल. महाभारतांत विश्वामित्र-मेनकेचें कथानक आहे. कण्वाश्रमामध्यें जेव्हां दुष्यंत शकुंतलेस पाहतो तेव्हां 'तूं कोण' म्हणून विचारतो. आपण कण्वकन्या आहोंत हें ती सांगतेच. राजास नवल वाटतें, म्हणून ती विश्वामित्र—मेनकेच्या मीलनाची म्हणजे स्वतःच्या जन्माची कथा सांगते. या ठिकाणीं महाभारतांत साधें कथन असून मुक्तेश्वरी कथानकांत रसवत्ता आहे. येथें औचित्याच्या दृष्टीनें विचार केला तर भारतीय साधें कथनच अत्यंत सुंदर आहे. शकुंतलेसारख्या प्रौढ कुमारिकेनें आपल्या आईबापांचा पांचट शृंगार एका अनोळखी व्यक्तीपुढें, त्यांतहि पुरुषापुढें, त्यांतूनहि स्वतःवर अनुरक्त असलेल्या राजापुढें आणि त्यांतूनहि एकांतांत सांगणें औचित्याला हानिकारक आहे. परंतु मुक्तेश्वरांस त्याचें भान रहात नाहीं,

आणि ते तेथेंहि रसनिर्मिति करितात. आपण येथें औचित्याच्या दृष्टीनें विचार करीत नसून केवळ स्वातंत्र्याच्या दृष्टीनें विचार करीत आहोंत. यास्तव एवढेंच सांगणें पुरे कीं संस्कृत महाभारतांत जेथें रसवत्ता नाहीं, तेथें आमच्या कवींनीं रसवत्ता निर्माण केली आहे. पंतांतहि अनेक ठिकाणीं असाच प्रकार आहे. म्हणजे जेथें महाभारतांत रस नाहीं तेथें पंतांच्या काव्यांत रसवत्ता आली आहे. अर्थात अशा प्रकारें मुळांत नसलेल्या भावनांचें आलेखन करून रसवत्ता निर्माण करणें हें केवळ स्वतंत्रतेचेंच लक्षण आहे. यांतहि पुन्हां अधिक खोलवर विचार करावयाचा असल्यास मी हें निश्चितपणें सांगूं शकतों कीं ज्या साधनांच्या योगांनीं आणि ज्या भूमिकेवरून महाभारतकारांनीं रस निर्मिला आहे, त्या भूमिकेवरून आणि त्या साधनांनीं आमचे कवि रसवत्ता निर्माण करीत नाहींत. ही रसवत्ताच पुष्कळ वेळां पात्रांच्या स्वभावावर परिणाम करते आणि त्यामुळें आमच्या मराठी भारतांतील पात्रें संस्कृत महाभारतांतील पात्रांहून भिन्न होतात.

रसांच्या दृष्टीनें आणिकहि एक विचार सांगण्याजोगा आहे. त्या योगानेंहि आमच्या मराठी कवींची स्वतंत्रता निदर्शनास येते. एकंदर संस्कृत महाभारतांत शांतरस प्रमुख होय आणि मराठी भारतीय रचनाच भक्तिरसावर आधारलेली आहे. मराठी कवींच्या भारत रचनेच्या मुळाशीं शांति नसून भक्ति आहे. आपली भक्ति प्रगट करण्यासाठीं, आणि जनतेंत भक्तीचा प्रसार करण्यासाठींच मराठी कवींनीं भारतें रचिलीं. यास्तव त्यांच्या सबंध भारताच्या दृष्टीनें भक्ति हाच मुख्य रस आहे. इतर रस भक्तीचें अनुरंजन करण्यासाठीं यांत आले आहेत. भारतीय वीर जसे परब्रह्मासहित देव आणि दानव यांचे अवतार होते तसेच एका रसब्रह्माचे भक्ति आदिकरून हे अंशावतार होत. यांत भक्ति

मुख्य असून इतर रस तिच्या अनुषंगानें वसतात. संस्कृत भारतांत भक्तिरस फारच अल्प आहे. यास्तव या रसांतील मराठी कवींची रचना अगदीं स्वतंत्र आहे.

एकंदरींत आमच्या मराठी कवींनीं भावनाविभागांत दाखविलेली स्वतंत्रता वाखाणण्याजोगी आहे. भारतांत बहुधा भावना साध्या, सरळ आणि क्वचित् एकाद्या विशिष्ट पद्धतीनें संमिश्र आहेत. पण मराठी रचनेंत भावनांचें हें साधेपण नाहीं, आणि संमिश्र पद्धतींत त्यांनीं भारताची पद्धति स्वीकारली नाहीं. त्यांनीं भिन्न भावनांचें मिश्रण स्वतंत्रपणें केलें, आणि स्वेच्छेनुसार त्यांचा विनियोग केला. भारतांत नसलेल्या ठिकाणीं त्यांनीं रस निर्मिला. भारतांतील शृंगाराला अधिक उठाव आणला. शांताला मागें टाकिलें. भारताच्या मानानें त्यांनीं शांताची उत्पत्ति केली नाहीं, आणि केली ती त्यांना साधली नाहीं. या उलट मराठी कवींनीं तेथें भक्तीची लावणी केली आणि तिचें पीकहि मन भरून नि भारून जाण्याइतकें काढलें. त्याचप्रमाणें रसनिर्मितीसाठीं घेतलेला अवकाश, साधनसामुग्री, शब्दरचना, कल्पनाविलास, भावनाविलास इत्यादि गोष्टींतहि मोठा भेद आहे. या सर्व विभागांत मराठी कवींनीं आपलें संपूर्ण स्वातंत्र्य दर्शविलें आहे.

**स्वातंत्र्यासंबंधीं आणिक विचारः पंतांनीं मुक्तेश्वरी भारताचें केलेलें अनुकरणः** पंतांनीं आपल्या भारतांत ज्याप्रमाणें टीकेचा उपयोग केला आहे, त्याप्रमाणेंच मुक्तेश्वरी भारताचाहि उपयोग केलेला आढळतो. कोणताहि चांगला ग्रंथकार आपल्या आवडीच्या ग्रंथासंबंधीं शक्य तितक्या विवेचकतेनें ज्ञान संपादन करतो. पंतांना भारतरचना करावयाची होती आणि पंत हे सुरसिकहि होते. तेव्हां मराठी भाषेंत त्यांच्या

काळीं प्रसिद्ध असलेले आणि त्यांना उपलब्ध असलेले भारतविषयक मराठी ग्रंथ त्यांनीं पाहिले असावेतच. त्यांतून विशेष प्रसिद्ध आणि रसाळ ग्रंथांचा परिणाम त्यांच्या अंतःकरणावर होणें साहजिक आहे. अशा प्रकारच्या सर्व भारतांत मुक्तेश्वरांच्या भारतानें अग्रेसरत्व घेतलें होतें. त्यांची ख्याति महाराष्ट्राच्या सर्व प्रान्तांत झाली होती हें सर्वश्रुतच आहे. पंतांनीं मुक्तेश्वरांचें भारत वाचिलें होतें; आणि त्यांना त्याच्यासंबंधीं फार आदर वाटत होता हें त्यांच्या पुढील उल्लेखावरून सुस्पष्ट आहे. "मुक्तेश्वरकृत भारत, आवडतें विठ्ठलासि कीं पर्व। सर्व श्रवणें हरितें आशा कविच्या अशेषही गर्व॥" "श्रीमुक्तेश्वर कविवर, यातें कोण न शुभेच्छु वंदील ?। वंदी लक्ष जयाचे, ज्याचें यश भव्य जेविं मंदील॥" (मोरोपंत–सन्मणिमाला). यास्तव पंतांच्या आर्याभारतांत मुक्तेश्वरी भारताचा आशय आल्यास कांहीं नवल नाहीं. मुक्तेश्वरांनीं एकंदर सबंध मराठी भारतीय ग्रंथांवरच परिणाम केला आहे, हें सारस्वतकार भावे आणि पांगारकर यांनीं एतत्संबंधींच्या प्रकरणांत उल्लेखिलें आहेच. त्यांच्या विधानांत अतिशयोक्तीचा भाग असला तरी सत्याचा अंशहि पुष्कळच आहे, हें नाकारतां येत नाहीं. त्याचप्रमाणें पंतांच्या भारतावरहि मधून मधून मुक्तेश्वरी छाया हालत असलेली दिसते. अशीं ठिकाणें पाहूं गेल्यास पुष्कळच सांपडतात. वानगीसाठीं दोन तीन स्थळांचेंच विवेचन करितों:—भीष्मांनी द्रोणांला आणविलें ती आर्या अशी:—'श्रीगुरुसम गुरुबंधु प्रेमें भेटोन निववीला भीष्में। जैसा मयूर मेघें, जो तापविला सुदुःसहें ग्रीष्में॥१।२४।२१. प्रस्तुत पराडकरी प्रतींत ही आर्या आहे. पण हिच्यावरील टीकेंत संपादक म्हणतात कीं मूळ पंतांच्या हस्तलिखित प्रतींत हिच्या ठिकाणीं दुसरीच आर्या होती. ती पंतांनीं स्वहस्तें खोडून टाकून ही लिहिली. काढून टाकलेली आर्या अशी:—'आणविला राजगृहीं

धाडुनियां सचिव आणि शिबिकेला। भीष्में—हीत द्विजपति रक्षूनि कपोत-पाल शिबि केला' पण ही आर्या मुक्तेश्वरी "पाठवुनी शिबिका यान। द्रोण आणिला पाचारून" या ओंवीप्रमाणें आहे. ह्याच प्रसंगाचें मुळांतील वर्णन असें आहे. 'युक्तरूपा स हि गुरुरित्येव मनुर्चिल्य च। अथैव मानीय तदा स्वयमेव सुसत्कृतम्' १।१३१।३८. प्रस्तुत पराडकरी प्रतींत छापलेली आर्या भारतीय श्लोकास धरून अधिकार्थ—प्रतिपादक आहे. यास्तव तीच पंतांनीं इष्ट म्हणून ठेविली हें योग्य केलें. पण येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं पंतांनीं यास्थळीं प्रथम पूर्वीची आर्या कां रचिली आणि ती मूळ भारतांत नसलेल्या प्रधान आणि शिबिका धाडण्याच्या उल्लेखासह कां आली? ह्याचें उत्तर अगदीं सरळ हेंच कीं मुक्तेश्वरी भारताच्या अनुकरणानें ती आली. काकतालीय न्यायानें तिच्यांतील अर्थ मुक्तेश्वरी ओंवीच्या अर्थाप्रमाणेंच आला नसून समोर असलेल्या वा चिर-स्मरणारूढ असलेल्या मुक्तेश्वरांच्या कृतीमुळें तो आला. यावरून पंतांनीं मुक्तेश्वरांचें भारत नुसतें वाचून टाकिलें होतें असेंच केवळ नव्हे, तर वारंवार परिशीलनानें तें चांगलें ध्यानांत ठसविलें होतें. प्रथम पंतांनीं ती आर्या लिहून तर टाकिली पण तिचा भारताशीं किंचित विरोध दिसतांच किंबहुना भारतभाव साकल्यानें व्यक्त करणारी दुसरी सुंदर आर्या निर्माण होतांच ती खोडून टाकिली.

(२) सावित्रीच्या आख्यानांतील पंतांची ही आर्या पहा:—

"मुनि व्यास म्हणे होती सावित्री नाम अश्वपति—तनया। तच्चरित श्रवण करीं ऐकाया योग्य, साधु, पतित न या॥" ३।१३।२. हिच्यावर टीका करते वेळीं हंस म्हणतात 'यांत सावित्रीचें चरित्र ऐकावयास साधुच योग्य, पतित योग्य नाहींत असें म्हटलें आहे तें पंतांसहि संमत असेल असें आम्हांस वाटत नाहीं' (हंसकृत निबंध

मोरोपंत, पृ. १२४ ). पण हंसांचा हा असमाधानकारक अर्थ पंतांना संमत असेलसें मला वाटत नाहीं. मुक्तेश्वरांच्या ह्या आख्यानाच्या शेवटच्या ओंवीकडे पाहिलें नि तिच्या संगतीनें हिचा अर्थ लावूं गेलें तर कांहीं वेगळीच गोष्ट बाहेर येते. मुक्तेश्वरी ओंवी अशी, "मुक्तेश्वराचीं सुढाळ वचनें। परमार्थ--चंपकाचीं सुमनें। तेथें अभक्त--अधमांचीं मनें। योग्य न होती परिमळा ॥ ३।१६।१४९. हींत कवीनें अभक्तांचा आणि अधमांचा धिःक्कार केला आहे. पण पंत जेव्हां सावित्री-आख्यान लेहावयास बसले तेव्हां मुक्तेश्वरांची ही कल्पना त्यांस डांचत होती. म्हणूनच त्यांनीं साधू आणि पतित असे शब्द योजून तें ( मुक्तेश्वरांचें काव्य आणि हें सावित्रीचें आख्यानहि ) सर्वांनाच ऐकावयास योग्य आहे, त्याच्या ठिकाणीं भेदभाव नाहीं, तें दोघांनाहि कल्याणकारक आहे, अशा समुचित अर्थयोजनेनें सर्वांची सोय करून दिली. ह्यास पुष्टी देण्यासाठींच त्यांची हिजपुढील आर्या आहे. ही कल्पना येथें येण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. पण मुक्तेश्वरांचें तें प्रकरण वाचल्यानंतर आपणाला स्वतःला लिहिण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां पंतांनीं ती पावन करून, तिच्यांतील वैगुण्य काढून अशाप्रकारें वापरली, असा ह्या आर्येचा इतिहास आहे.

( ३ ) याच आख्यानांत "ऐसें सती वदे; तो बोल शशी, देव तोहि सागरसा। प्रेमें उचंबळे हो, धरि कारुण्यें द्रवासि साग रसा ॥ ३।१३।६४. ही पंतांची अति सुंदर आर्या आली आहे. पण हिचें मूळ मुक्तेश्वरांच्या "देखतां पूर्ण चंद्र। सांडी मर्यादा समुद्र। तेंवी दक्षिण दिशेचा इंद्र। वरदानीं वोळगला ॥ ३।१६।१०६ ह्या ओवींत आहे. यमाचें अंतःकरण उचंबळून आलें. हीच गोष्ट दोघांनींहि सांगितली आणि समुचित अलंकाराचें भावनिदर्शन केलें. पण मुक्तेश्वरांनीं

पूर्ण चंद्र घालून 'समुद्रास जशी भरती येते' अशी उपमा योजून ती वर्णिली आणि पंतांनीं याहिपेक्षां पुढें जाऊन एकात्मकता दर्शविण्या-साठीं सावित्रीच्या शब्दावर चंद्राचें आणि यमावर सागराचें रूपक केलें. पण पंत इतकेंच करून थांबले नाहींत तर, अधिक सौहार्द आणि कारुण्य उत्पन्न करण्यासाठीं त्यांनीं सर्व पृथ्वी देखील कारुण्यानें विरघळली असा अधिकार्थ आणला आणि कोमलता प्रगट केली. या ठिकाणीं मुळांत अगदीं सुद्धां कल्पनाविलास नाहीं.

वरील उदाहरणांवरून हें स्पष्ट प्रतीत होतें कीं पंतांनीं मुक्तेश्वरांचें भारत केवळ पाहिलें होतें असेंच नाहीं तर त्यांनीं त्याचें चांगलें परि-शीलन देखील केलें होतें. कारण पुष्कळ वेळां मुळाशीं विरोध आला आहे. मुळाहून अधिक भाग आला आहे. मुळांत नसलेली कल्पना, मुळांत नसलेलें संभाषण नि मुळांत नसलेली भावना ह्या साऱ्या गोष्टी पंतांच्या रचनेंत आढळतात. त्यांचा मुळाशीं कांहींहि संबंध नसतो, पण मुक्तेश्वरांनीं त्या त्या ठिकाणीं योजिल्या असल्याकारणानें पंतांनींहि तीं योजिलीं आहेत. त्यांत कित्येक जागीं तर पंतांनीं शब्दरचनाहि मुक्ते-श्वरांसारखीच ठेविली आहे, पुष्कळ जागीं त्यांचा भावार्थ प्रगट केला आहे, आणि क्वचित् कोठें मुक्तेश्वरांनीं एखादी कल्पना भलत्याच स्थळीं योजिली असल्यास पंतांनीं तिला सुस्थानीं स्थापिलें आहे. आणि कित्येक ठिकाणीं तर मुक्तेश्वरांनीं अर्धवट सोडलेली कल्पना पंतांनीं पूर्ण केली आहे. अशाप्रकारें आदि, सभा व वन या पर्वांत अशीं बिंब–प्रतिबिंब–स्थळें अनेक दिसतात. अर्थात पंतांनीं आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवींचें चांगलें अध्ययन केलें असून मुक्तेश्वरांनीं ज्याप्रमाणें आपलें महाभारत सजविलें त्याप्रमाणेंच पंतांनींहि आपलें आर्याभारत सजविलें आहे. अशा प्रकारें पदरच्या गोष्टी घालणें आणि

ग्रंथांतरांतून सौंदर्यस्थळें निवडून आणून आपल्या कृतींत योजणें नि तिला सौंदर्यसंपन्न करणें हें भाषांतराच्या कक्षेबाहेरील कार्य आहे. भाषांतरकार अशी रचना आणि उसनवारी करूं शकत नाहीं. हीं सर्व लक्षणें स्वतंत्रतेचीं सूचक आहेत.

**मुक्त–मयूरांनीं घेतलेलें प्राकृत कवींचें ऋण:** आतांपर्यंतच्या विवेचनावरून, मुक्त-मयूरांच्या अनुषंगानें आमचे मराठी कवि स्वतंत्र होते, त्यांनीं भारती कथानकाचा केवळ नांवापुरताच आधार घेतला हें सप्रमाण दर्शविलें आहेच. पण त्याव्यतिरिक्तहि त्यांच्या स्वातंत्र्याची निदर्शक अशी आणिकहि एक गोष्ट आहे ती दोघांच्याहि विषयांत अगदीं समर्पकतेनें लागू पडते. मुक्तेश्वरांनीं तिचा उपयोग फार केला असून पंतांनीं अल्पांशानें केला आहे. ती गोष्ट म्हणजे प्राकृत कवींचा आधार. मुक्तेश्वरांनीं आपलें भारत सजविण्यासाठीं प्राकृत कवींचा पुष्कळच आधार घेतला आहे. पंतांच्या भारतांत तो तितका स्पष्ट दिसत नाहीं, पण त्यांच्या काव्यावर एका मुक्तेश्वरांचाच किती परिणाम झाला होता हें जें वर दर्शविलें त्यावरूनच प्राकृत कवि त्यांच्याहि पुढें होते असें दिसतें. पण मुक्तेश्वरांवाचून दुसरा कोणीहि त्याजवर आपला प्रभाव गाजवूं शकला नाहीं, असेंच त्यांच्या अनुल्लेखां-वरून आणि अशीं साम्यस्थळें न आढल्यावरून वाटतें. मुक्तेश्वरांनीं प्राकृत कवीचें ऋण घेतल्याची गोष्ट पुष्कळ ठिकाणीं सांगितली आहे, एवढेंच नव्हे तर प्रसंग विशेषीं त्यांजवर टीकाहि केली आहे. कांहीं प्रसंगीं तर त्यांनीं प्राकृत कवींचें काव्य आत्मसात करून आपल्या सुपरिष्कृत वाणीनें त्याला नवा उजाळा देऊन आपल्या गगनविहारी प्रतिभेच्या पंखांवर बसवून काव्यगंगेच्या तीरावर विहारासाठीं आणलें आहे. त्याचप्रमाणें दोघांनींहि भारतेतर अनेक संस्कृत ग्रंथांचा उपयोग केला आहे. पौराणिक

दृष्टांत देण्यासाठीं आणि अधिक कथा घालण्यासाठीं किंवा भारतीय कथा विशेष रंगविण्यासाठीं दोघांनींहि अधिक उण्या प्रमाणांत सर्वच पुराणांचा उपयोग केला आहे. मुक्तेश्वरी भारतांत, श्रीमद्भागवत, वाल्मीकिरामायण, जैमिनी अश्वमेध, भारत मंजरी, नागानंद नाटक, कथासरित्सागर, सुभाषितरत्नभांडार, पद्मपुराण, स्कंदपुराण, इत्यादि अनेक पुराणांचा आणि संस्कृत ग्रंथांचा सढळपणें उपयोग केलेला आढळतो. हा भाग पंतांपेक्षां मुक्तेश्वरांत अधिक आहे. मुक्तेश्वरी रचनेंत मराठी पैकीं ज्ञानेश्वरी, नाथभागवत, कथाकल्पतरु, विष्णुदास नामाचें भारत, नाथांचें भावार्थ रामायण, जनाबाईचें थालिपाक, हरिश्चंद्राख्यान आणि द्रौपदी वस्त्रहरण व गुरुचरित्र हे ग्रंथ स्पष्टास्पष्ट, दृश्यादृश्य रूपानें संचार करीत असतांना आढळतात. पुराणांतील प्रसिद्ध गोष्टी सांगण्यांत त्यांना विशेष असें कांहीं वाटत नाहीं. पण परमेश्वरानें मुक्तेश्वरांच्या काळीं जे कांहीं चमत्कार केले आणि जे भक्त तारले त्यांचे गुणानुवाद करण्यांत त्यांना भूषण वाटत होतें. अशा प्रकारचे उल्लेख करण्यास परमेश्वरानेंच आपणांस आज्ञा केली असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. त्यावरून त्यांनीं प्राकृत कवींचा तर उपयोग केलाच पण स्वकालीन प्रत्यक्ष पाहिलेल्या वा ऐकिलेल्या गोष्टींचाहि आपल्या भारतांत निर्देश केला आहे असें दिसतें. अशा प्रकारें मुक्तेश्वरी रचना पुष्कळच भारत भिन्न, स्वतंत्र आणि इतर प्राकृत कवींच्या रचनेवर अधिष्ठित आहे. यावरून मुक्तमयूरांचीं भारतें आणि तदनुसार इतर सर्वहि मराठी भारतें कशीं स्वतंत्र आहेत, यासंबधीं आतां अधिक विवेचन करण्याचें कारणच नाहीं.

भाषांतर शब्द अगदीं अलिकडचा आहे हें कोणाला नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. एका भाषेंतील अर्थ दुसऱ्या भाषेंत आणणें ही भाषांतरासंबंधीं अगदीं ढोबळ कल्पना आहे. भाषांतर शब्दानें दुसरी

भाषा एवढी एकच कल्पना वाचकांच्या मनांत येते. त्यामागें असलेली विचारसरणी पाहिली असतां हेंच दिसतें कीं भाषेव्यतिरिक्त मुळांतील कोणताहि अंश अंतर्हित व्हावा किंवा झाला आहे असें रसिकांस वाटत नाहीं. मूळकृति आणि भाषांतरित कृति ह्या दोन्ही एकच आहेत, दोन्हीं-तील कथानक, त्यांचा क्रम, त्यांची मांडणी, त्यांतील प्रसंगवर्णनें, स्वभाव-परिपोष, विचारसरणी, कल्पनाविलास, रसोत्कटता आणि एकंदर वस्तु-विषय हा एकच असून दोन्हींच्या भाषा मात्र भिन्न आहेत, हीच कल्पना प्रामुख्यानें वाचकांच्या मनांत उत्पन्न होते. कालिदास, भवभूति, शेक्सपियर इत्यादींच्या नाटकांचीं मराठी भाषांतरें पहा. त्यांतील सर्व कथावस्तु, वर्ण्यविषय, भावनावेग आणि रससिद्धि हीं तींच (मूळांतील) पाहिजेत अशी अपेक्षा वाचक करतो. ज्या भाषांतर कृतींत ह्या सर्व गोष्टी वा बहुसंख्य गोष्टींची भट्टी उत्कृष्ट साधली असेल तिलाच उत्कृष्टतेचें पारितोषिक तो देतो. भाषांतरांत भाषेवांचून दुसरी कोणतीहि गोष्ट भाषांतरकारांची स्वतःची नसते. मूळ ग्रंथांतील विनोद, कोट्या, मार्दव, पदलालित्य, शब्दसौष्ठवादि गुण, आल्हाददायक अर्थ, विशिष्ट गोष्टीं-तील मार्मिकता, मानवी स्वभावांतील रंगसंगती सर्व रसांची प्रतिपत्ति आणि मूळ ग्रंथकाराची ग्रंथलेखनाची विशिष्ट भूमिका ह्या सर्व गोष्टींची मुळांतील मांडणी भाषांतरांत आली पाहिजे. त्यांत काडीइतका फेरफार करण्याचा भाषांतरकाराला अधिकार पोंचत नाहीं. दुसऱ्यांचे विचार, दुसऱ्यांच्या भावना, दुसऱ्यांचे अलंकार आणि दुसऱ्यांचीं वर्णनें इत्यादि सर्व साहित्य सामग्री दुसऱ्यांची घेऊन स्वतःच्या भाषेंत कथानक जसेंच्या तसें प्रकट करणें आणि मुळांतील परिणामकारकता आणणें एवढेंच कार्य भाषांतरकर्त्याचें असतें. एकढ्यावरून भाषांतर–कर्त्याला महत्व

नाहीं असें म्हणणें मात्र उचित होणार नाहीं. मनुष्याला स्वतःच्या बुद्धीनें बरीवाईट गोष्ट निर्माण करण्यास जड जात नाहीं. आपल्या बुद्धि-विशेषानुसार आणि स्वतंत्र कौशल्यानुरूप तो स्वतंत्र कृति निर्माण करतो, पण दुसऱ्याचें धोरण सांभाळून, त्याचें सर्व प्रकारांत अनुकरण करणें हें काम किती बिकट आहे हें 'जावें त्याच्या वंशा' तेव्हांच कळण्या-सारखें आहे. मुक्त मयूरांनीं ( आणि आमच्या सर्वच मराठी कवींनीं ) हें भाषांतराचें धोरण पाळलेलें नाहीं, किंबहुना त्यांच्या रचनेकडे पाहिलें म्हणजे त्यांचें धोरण भाषांतर करण्याचें नव्हतें असेंच दिसतें.

दुसरी गोष्ट अशी कीं महाभारत ही अत्यंत रमणीय कलाकृति आहे. प्रत्येक कलावंत आपल्या दृष्टीनें आनंदाचा आस्वाद चाखवितो, पण त्याची कला-निर्मितीची भूमिका कांहीं वैशिष्ट्यपूर्ण असते. त्या भूमिके-वरूनच तो ललितकृति निर्मितो आणि अपेक्षित, इष्ट तो परिणाम घडवून आणतो. त्या निर्मितीच्या प्रसंगींची त्याचीं साधनेंहि साधीं नसून वैशिष्ट्यपूर्ण असतात. एवंगुणविशिष्ट ललित कलाकृति केवळ साऱ्या बाह्य गोष्टींचें अनुकरण केल्यानें भाषांतरित कशी होईल? जोंपर्यंत भाषांतरकार मूळ ग्रंथलेखकाच्या भूमिकेवर अवतरणार नाहीं आणि त्यानें वापरलेलीं वैशिष्ट्यपूर्ण साधनें त्याच प्रकारच्या कौशल्यानें वापरणार नाहीं, तोंपर्यंत त्या प्रयत्नांची इष्ट कार्यांत परिणति होणार नाहीं. आणि परिणाम जर भिन्न झाला तर त्या दोन्ही कृती एक कशा? यास्तव भाषांतराच्या परीक्षणाच्या समयीं वा एकादा ग्रंथ भाषांतरित आहे कीं स्वतंत्र आहे हें ठरवितांना शास्त्रीबुवांनीं निबंधमालेंत सांगि-तल्याप्रमाणें विचार, अलंकार, भाषापद्धति आणि एकंदर विषयाची मांडणी हीं तर पहावींतच; पण केवळ त्यांजवरच विसंबून राहतां येत

नाहीं. कथानक, स्वभावपरिपोष इ. भूमिका आणि परिणामकारकता ह्यांच्या मानानें ह्या गोष्टीहि बाह्य आहेत. यास्तव दोन्ही कर्त्यांच्या भूमिका आणि त्यांची परिणामकारकता हीं अवश्य आणि प्रथम पाहिलीं पाहिजेत. ह्याच्याविना दिलेला निर्णय योग्य होणार नाहीं. तो प्रामाण्याच्या पदवीला पावणार नाहीं.

**सर्व प्रमाणें लावून पाहतां आमचीं मराठी भारतें स्वतंत्र कृति आहेत:**—मुक्त-मयूरांच्या ग्रंथाला भाषांतराचीं एकंदर प्रमाणें लावून पाहिलीं; श्लोक, ओव्या, आर्या ह्यांचेंहि प्रमाण लावून पाहिलें; पर्वें, उपपर्वें, अध्याय, ह्यांचेंहि प्रमाण लावून पाहिलें, आणि विचार, अलंकार, कथानकाची मांडणी, ह्यांचेंहि प्रमाण लावून पाहिलें; पण ह्या सर्वांतून हेंच दिसून आलें कीं आपल्याला पाहिजे तेवढीच कथावस्तु आमच्या प्राकृत कवींनीं भारतांतून स्वीकारिली आहे. ह्या एकाच विशेष प्रस्फुटतेनें दिसणाऱ्या गोष्टीवरून आजपर्यंत त्यांच्या ग्रंथाला सामान्यतः आणि पंतांच्या भारताला विशेषतः, भाषांतर म्हणण्यांत येतें. पण हें मत प्रामादिक आहे, हें वरील विवेचनावरून स्पष्टच झालें आहे. वस्तुतः केवळ भाषांतराच्या उद्देशानें झालेलीं भाषांतरें म्हणजे अलिकडे चिपळूणकर आणि मंडळी, बापटशास्त्री, यंदे आणि मंडळी, इत्यादींनीं केलेली रचना होय. मुक्त-मयूरांच्या आणि सर्वच मराठी भारतांना स्वतंत्र भूमिका आणि परिणामकारकता आहे. पण आजपर्यंतच्या परीक्षणांत आणि निर्णयांत हीच सर्वांत अधिक उपेक्षिलेली गोष्ट आहे. तिघांच्याहि भारतांत समानस्थळें असलीं तरी तिघांच्याहि भिन्न भूमिकांचा आणि त्यांच्या परिणामकारकतेचा कोणीं विचार केला नाहीं. तिघांनींहि भारतच सांगितलें, पण व्यासांची भूमिका मुख्यतः इतिहास

सांगून तदनुषंगानें नीति, धर्म, तत्त्वज्ञान, सदाचार इत्यादि विवरण करण्याची आणि शेवटीं कृष्णभक्ति-प्रसाराची आहे. मुक्तेश्वरांची भूमिका "जेणें वाढे उत्कट भक्ति। तो तो विशेष लिहिला ग्रंथीं" अशी लोकांत भक्तिभावना वाढवून लोकोद्धारासाठीं ग्रंथनिर्मितीची मुख्यतः आहे. मनो-रंजन, ज्ञानदान, नीतिशिक्षण इत्यादि त्यांचे गौण हेतु आहेत, किंबहुना ह्या सर्वांचा त्यांनीं आपल्या मुख्य उद्देशाच्या सिद्धीसाठीं साधनांप्रमाणें उपयोग केला आहे. व्यासांचा उद्देश आधीं इहलोकींची यात्रा सफल करून, नंतर मोक्षाचें साधन जोडून देणारा मार्ग दाखविण्याचा आहे, तर मुक्तेश्वरांची भूमिका परलोकसाधन करून देणाऱ्या कृष्णभक्तीची असून अवांतर गोष्टींना त्यांत गौण स्थान आहे. आणि मोरोपंतांची भूमिका तर "आपण कांहीं तरावया गावें" अशी आत्मशोधन आणि आत्मोद्धार हीच आहे. नीतीचे पाठ, धर्माचे धडे आणि सदाचाराचे सोपान त्यांनीं आपल्यासाठींच आधीं निर्माण केले. त्यांचा लाभ वाट-ल्यास इतरांनीं घ्यावा आणि गोष्टी-वेल्हाळांनीं करमणूकहि करून घ्यावी असा त्यांचा मानस दिसतो. अर्थात् तिघांनीं तीन निरनिराळ्या भूमिकां-वरून तीच गोष्ट सांगितली असल्याकारणानें कथेंत स्थूलमानानें समानता अपरिहार्य असली तरी तिला भाषांतर म्हणतां येत नाहीं. आतां परि-णामाच्या दृष्टीनें पहा. मूळ भारत आणि भाषांतरित प्रतिकृति या दोन्हीं-चेहि परिणाम वाचकाच्या मनःपटलावर सारखेच व्हावयाला पाहिजेत; पण येथें तो प्रकार अगदींच दिसत नाहीं. मूळ महाभारत, मुक्तेश्वरांचें भारत, आणि पंतांचें आर्याभारत या तिन्हींचे परिणाम वाचकांवर वेग-वेगळे ठसे उमटवितात. हे भारतभिन्न परिणाम त्यांनीं आपल्या स्वतंत्र भूमिकांवरून जी विशिष्ट रचना केली तिजमुळें झालेले आहेत. ह्या

स्वतंत्र भूमिकांमुळेंच परिणामहि भिन्न झाले नि त्यांच्या कृतींत पृथगात्मता आली. जेथें पृथगात्मता आहे तेथें नवनिर्मिति ही निश्चितच येते. नवनिर्मितीसाठीं कथानक हें अवश्यमेव नवीन पाहिजे हें म्हणणें केवळ दुराग्रहमूलक आहे. एवंच मुक्तेश्वरांच्या भारतांत, मोरोपंतांच्या आर्याभारतांत आणि आमच्या एकंदर मराठी भारतांत पृथगात्मता आहे. यास्तव मुक्तमयूरांचीं भारतें स्वतंत्र तर आहेतच, पण एकंदर मराठी भारतेंहि नवनिर्मिति असून तीं स्वतंत्र आहेत हें सिद्ध होतें.

REFBK-0008878